
दीपगीतांनी झगमगली दिपवाली...



दीपक, दिया, चिराग, दीप वगैरे दिव्याला पर्यायी शब्दांचा हिंदी चित्रपट गीतांत वरचे वर उल्लेख आढळतो. दिवाळीइतकंच नवरात्रीतही दिव्यांचं, दीपमाळेचं महत्त्व असतं. त्यानिमित्ताने अशा काही दीपगीतांची एक माळ...

□ अजित पोपट

लोककथा म्हणा नाहीतर दंतकथा. पण ती आहे रंजक. अकबराच्या दरबारातील नऊ रत्नांपैकी तानसेन हे एक रत्न होतं. त्यांचे हितशत्रू नेहमी अकबराकडे तानसेनच्या विरोधात कानभरणी करत. एकदा त्यांनी अकबराला सांगितलं, की जर तानसेन खरे गायक असतील तर तुम्ही त्यांना दीपराग गाऊन दीप प्रज्वलीत करायला लावून त्यांची परीक्षा घ्या. झालं, अकबराने भरदुपारी तानसेनना दीपराग गाण्याचा हुकूम केला.

शास्त्रीय संगीताच्या नियमानुसार मध्यान्हीला दीपराग आळवायचा नसतो. त्याची आग तुम्हा आम्हाला जाळून टाकेल, या शब्दांत तानसेननी बादशहाची समजूत काढायचा प्रयत्न केला. पण राजहट्टच तो. अखेरीस तानसेननी गीत सुरू केलं

दीया जलाओ दीया जलाओ
झगमग झगमग दीया जलाओ...

अमर गायक अभिनेता कुंदनलाल सायगल यांच्या अविस्मरणीय गीतांत या दीपगीताचा समावेश होतो. आता मध्येच दीपगीतांचं प्रयोजन काय? तर सध्या नवरात्र चालू आहे. नवरात्रीत घट बसतात. गुजराती घरांतून बसणाऱ्या या घटांना छिद्रं असतात. त्यात एक दिवा ठेवला जातो. माणसाच्या मनातला अंधःकार दूर करून ज्ञानाच्या प्रकाशाने त्याचं जीवन उजळून निघावं हा नवरात्रीच्या दिव्यांचा अर्थ आहे. म्हणूनच आज हिंदी चित्रपट गीतांतील दीपगीतांची माळ लावून आपण नवरात्र साजरं करू या.

सायगलच्या दिया जलाओ (*तानसेन* १९४३, संगीत खेमचंद प्रकाश) सारखंच आणखी एक गाणं आहे नूरजहाच्या आवाजात. त्याच्या संगीतकाराचं नाव आजच्या पिढीला माहीतही नसेल. सायगलचा तानसेन ४३ साली आला तर नूरजहाचा *बडी माँ* १९४४मध्ये. त्याचे संगीतकार होते के. दत्ता. सी. रामचंद्रप्रमाणे के. दत्ताही मराठी भाषिक संगीतकार होते. लता मंगेशकरला पहिली संधी देणारे मास्टर विनायक *बडी माँचे* दिग्दर्शक होते.

नूरजहांच्या आवाजातलं हे गीत तिचे चाहते आजही आवडीने गातात. *बडी माँचा* विषय सामाजिक होता. त्यात एक गाणं होतं 'दीया जलाकर आप बुझाया...' हे गाणं ऐकल्यावर अनेक आघाडीच्या संगीतकारांनी तेव्हा के. दत्तांचं अभिनंदन केलं होतं.

शास्त्रीय संगीतावर बेतलेल्या चित्रपटगीतप्रेमींनी मालकंस रागावर आधारित गीतांची यादी बनवली असेल तर त्यात एक गाणं अवश्य असणार.

निर्बल से लडाई बलवान की
ये कहानी है दिये की
और तुफान की...

मालकंस रागातल्या या गीताचं वैशिष्ट्य असं की एकाच गाण्यात इतकी सरळ शब्दरचना आणि दुसरीकडे लढाईची भाषा असा संगम यात दिसतो.

तुफान आणि दिव्याचा विषय निघालाय तेव्हा मेहबूब खानच्या *सन ऑफ इंडियाचाही* उल्लेख व्हायला हवाच. त्यात क्लायमॅक्सला खलनायक जयंत बालकलाकार साजिदच्या हत्येचा प्रयत्न करतो. त्यावेळी नायिका कुमकुम शंकराच्या समक्ष सूचक शब्दांत एक नृत्यगीत सादर करते

दिया ना बुझे री आज हमारा
चले री पवन सननन सनन
थर थर कांपे जियरा, दिया ना...

गजेंद्रकुमार. मीनाकुमारी या जोडीचे काही

हिट चित्रपट होते त्यातला एक देवेंद्र गोयलचा *चिराग कहा रोशनी कहा* हा सामाजिक चित्रपट होता. याचं कथानक असं होतं की. एक विधवा मृत बालकाला जन्म देते तेव्हा मानवतावादी डॉक्टर आपलं नवजात बालक तिच्या ओटीत घालतो. हे कथासूत्र पकडून शीर्षकगीत लिहिण्याची दिग्दर्शकाने गीतकाराला विनंती केली. त्यावेळी *शहिद*साठी अर्थपूर्ण गीतं लिहिणाऱ्या प्रेम धवन यांनी एक सुंदर गीत लिहिलं-

अजब है मालिक तेरा जहां,
चिराग कहां, रोशनी कहां...

यात चिराग शब्द आई-वडील या अर्थाने आला आहे तर मूल त्याचा प्रकाश अर्थात रोशनी म्हणून अपेक्षित आहे. प्रत्यक्षात आपल्याकडे कुलदीपक हा जो शब्द रूढ आहे त्याला प्रतिशब्द म्हणून बऱ्याच हिंदी गीतांत चिराग हा शब्द वापरला जातो. पण या गीतात तो नेमक्या उलट अर्थाने आई-वडिलांसाठी वापरलाय.

आपल्या *एक नारी एक ब्रह्मचारी* चित्रपटासाठी निर्माता के. पी. आत्माने चिराग शब्दाचा वापर करून गीत लिहिण्याचा आग्रह धरला होता. त्यातलं हे गीतही पुढे बरंच लोकप्रिय ठरलं.




मेरी सुरत तेरी आँखेमध्ये अशोककुमार - आशा पारेख

चिराग किस के घर का है
तू लाल किस जिगर का
कंवल है कौन तलका...

यात शेवटच्या ओळीतले शब्द पाहा. तू कोणत्या तलावात उगवलेलं कमळ आहेस? कथानकात मुलाच्या आईच्या चारित्र्यावर चिखलफेक केली जाते. म्हणून इथे चिखलात उगवलेलं कमळ असाही अर्थ गर्भित असावा.

फिल्मी गीतांत अनेक ठिकाणी दिवा या शब्दाचा प्रतीकात्मक वापर केलेला दिसतो. १९५९ मध्ये *गेस्ट हाऊस* नावाचा एक चित्रपट आला होता. दिग्दर्शक रवींद्र जैनच्या या चित्रपटात अजित, शकिला, प्राण वगैरे कलाकार होते. एका वेगळ्याच अर्थाने गीतकार प्रेम धवन यांनी गीत लिहिलं.



चिराग कहाँ रोशनी कहाँमध्ये राजेंद्रकुमार - मीनाकुमारी
आणि बालकलाकार डेझी ईराणी

झूठ का दीप कभी न जलता
सांच को आंच नही प्यारे
कोई फिर क्यू हिंमत हारे...

याच प्रेम धवनने *टॅक्सी नंबर ५५५* (१९५८)साठी एक गीत लिहिलं होतं.

भोर भयी और पंछी जागे
दिया बुझा झटपट...

*मेरी सुरत तेरी आँखे*मध्ये दिवा या शब्दाचा वापर करून एक अर्थपूर्ण गीत आलं होतं. त्याबद्दल आजवर अनेकदा लिहिलं गेलं असल्याने इथे आपण फक्त त्याचा उल्लेख करू या.

इत जले दीपक उत मन मेरा
फिर भी न जाये मेरे
घर का अंधेरा
तडपत तडपत उमर गवाई
पूछो ना कैसे मैने रैन बिताई...

असाच संकेत राजेन्द्रकुमार, मीनाकुमारीच्या एका चित्रपटात होता.

हम यादों के दीप जलायें
और आसूं के फूल चढायें
सांसो का हर तार पुकारे
यह प्रेमनगर है,
दिल एक मंदिर है...

एकीकडे कुलदीपक या शब्दांत चित्रपट गीतांत मुलाचा गौरव केला गेलाय तर काही गीतकारांनी अगदी वेगळ्याच अर्थाने दीपक शब्द गाण्यांत वापरलाय. १९५९मध्ये प्रदर्शित झालेल्या *चिराग*मध्ये मजरूह सुलतानपुरींनी लिहिलं होतं,

चिराग दिल का जलाओ,
बहुत अंधेरा है,
कही से लौट के आओ
बहुत अंधेरा है...

मदन मोहनच्या संगीतात महंमद रफीने गायलेलं हे गाणं चांगलंच हिट ठरलं होतं. *मांग भरो सजना* (जितेंद्र-रेखा-मौसमी)मध्ये आनंद बक्षींनी लिहिलेलं आणि आशा-लताच्या आवाजातलं हे गाणं अतिशय हृदयस्पर्शी आहे.

दीपक मेरे सुहाग का जलता रहे
कभी चांद कभी सूरज बन के...

गायत्री महिमा (१९७७)मध्ये गीतकार भरत व्यास यांनी पती-पत्नीसाठी दिवा आणि ज्योतीचा प्रतीकात्मक उपयोग केला होता.

दीपक है तू पिया, मै तेरी ज्योती
तेरा मेरा जन्मों का साथ है
तू मेरी माला मै तेरा मोती...

तानसेनच्या गीताने लेखाची सुरुवात झाली तेव्हा तानसेनच्याच गीताने लेख संपवू या. स्वातंत्र्यानंतर तानसेनवर आणखी एक चित्रपट प्रदर्शित झाला. *संगीतसम्राट तानसेन*. १९६० मध्ये प्रदर्शित झालेल्या या चित्रपटात भारतभूषण, अनिता गुहा आणि डेव्हिड हे कलाकार होते. दिग्दर्शन आणि संगीत दोन्ही एस.एन. त्रिपाठींचे होते. यात तानसेनच्या दीपरागासाठी शैलेन्द्रने लिहिलेलं हे गीत पाहा...

चन्द्र छुपा, सूरज छुपा
दीपक जलाओ, ज्योती जगाओ...

तशी दीपक गीतावर आधारित अनेक गीतं आहेत. तरीही कुठेतरी थांबावं हे लागतंच ना! ☆